महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं/D१६०३४(३१)/१/२०२३-Desk १६ मुंबई, दिनांक - ई स्वाक्षरीत नमुद
२०/१०/२०२५.

**विषय :-** दिनांक २७ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर, २०२५ या कालावधीत **"दक्षता जनजागृती सप्ताह"** साजरा करण्याबाबत...

******

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाचे क्र. दजस-२०२५/प्र.क्र.५७/विचौ-२, दिनांक १४ ऑक्टोबर, २०२५ रोजीच्या परिपत्रकाची प्रत पुढील योग्य त्या कार्यवाहीकरिता सोबत जोडण्यात येत आहे.

२. उपरोक्त शासन परिपत्रकान्वये, दरवर्षी प्रमाणे या वर्षी देखील राज्यात दिनांक २७ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर, २०२५ या कालावधीत दक्षता जनजागृती सप्ताह साजरा करावयाचा आहे.

३. त्यासअनुसरुन, खालील घटकप्रमुखांना विनंती करण्यात येते की, दिनांक २७ ऑक्टोबर, २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता आपल्या कार्यालयात, भ्रष्टाचार निर्मूलनाची प्रतिज्ञा घेवून कार्यक्रमाचा प्रारंभ करुन, प्रतिज्ञा घेतल्यानंतर, मा. राज्यपाल व मा. मुख्यमंत्री यांनी या सप्ताहानिमित्त दिलेला संदेश उपस्थितांना वाचून दाखवायचा आहे.

४. तसेच, शासन परिपत्रकामध्ये नमुद केल्याप्रमाणे दिनांक २७ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर, २०२५ या कालावधीत दक्षता जनजागृती सप्ताहाच्या निमित्ताने कार्यक्रमांचे आयोजन करावे.

( अभिषेक त्रिमुखे )
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांचेकरिता.

प्रति,

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई (सस्नेह)
पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई (सस्नेह)
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक (दहशतवाद विरोधी पथक/वाहतूक/आर्थिक गुन्हे/रारापोबल/फोर्स वन/सायबर/महिला व बाल अत्याचार प्रतिबंधक विभाग/ना.ह.सं.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गासह)
अपर पोलीस महासंचालक व संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक
अपर पोलीस महासंचालक व संचालक, पोलीस दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे.



Scanned with OKEN Scanner

विशेष पोलीस महानिरीक्षक, व्हीआयपी सुरक्षा, महाराष्ट्र राज्य, मुंबई/मोटर परिवहन विभाग, पुणे /नक्षल विरोधी अभियान, नागपुर

सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक

विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर.

संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे.

सर्व पोलीस अधीक्षक (गुन्हे / बिनतारी संदेश / लोहमार्गासह)

पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, सुरावडी, अमरावती रोड, नागपूर.

प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक.

सर्व प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्र.

सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. १ ते १९.

प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रकटीकरण केंद्र, नाशिक / अपारंपारिक अभियान प्रशिक्षण केंद्र, नागपूर

प्रत,

पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक कार्यालय, मुंबई.

२. पोलीस उप अधीक्षक, यांनी सदरहू ज्ञापनाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर दक्षता जनजागृती सप्ताह / **Vigilance Awareness Week** या मराठी व इंग्रजी नावाखाली प्रकाशित करण्यात यावा.

Scanned with OKEN Scanner

**<u>दक्षता जनजागृती सप्ताह</u>**
**<u>साजरा करण्याबाबत.</u>**
**दि.२७ ऑक्टोबर ते ०२ नोव्हेंबर, २०२५**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक: दजस-२०२५/प्र.क्र.५७/विचौ-२**
**मंत्रालय, मुंबई -४०००३२**
**दिनांक - १४ ऑक्टोबर, २०२५**

**<u>पहा</u>** :- शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: संकीर्ण-२००१/११२८/प्र.क्र.४३/०१/११-अ, दिनांक : २२ ऑक्टोबर, २००१

## परिपत्रक

राज्यात दरवर्षी दक्षता जनजागृती सप्ताह (Vigilance Awareness Week) आयोजित करण्याचा निर्णय संदर्भाधीन दि.२२ ऑक्टोबर, २००१ च्या शासन आदेशान्वये घेण्यात आला आहे. यावर्षी **<u>दि.२७ ऑक्टोबर, २०२५ ते २ नोव्हेंबर, २०२५</u>** या कालावधीत दक्षता जनजागृती सप्ताहाचे आयोजन करण्यात येणार असल्याचे केंद्रीय दक्षता आयोगाने जाहीर केले आहे. या सप्ताहाकरीता यावर्षी **"दक्षता- आपली सामायिक जबाबदारी" (Vigilance: Our Shared Responsibility)** ही संकल्पना निश्चित करण्यात आली आहे.

२. त्यानुसार राज्यातदेखील यावर्षी दि.**२७ ऑक्टोबर, २०२५ ते २ नोव्हेंबर, २०२५** या कालावधीत दक्षता जनजागृती सप्ताहाचे (Vigilance Awareness Week) आयोजन करावयाचे आहे. या संदर्भात पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत-

अ) राज्य शासनाचे सर्व विभाग व त्यांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख, राज्य शासनाचे अंगीकृत उपक्रम, सहकारी संस्था, स्वायत्त संस्थांमार्फत वरील कालावधीत दक्षता जनजागृती सप्ताहाचे आयोजन करण्यात यावे.

ब) दि.२७ ऑक्टोबर,२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता भ्रष्टाचार निर्मूलनाच्या प्रतिज्ञेने कार्यक्रमाचा प्रारंभ होईल. विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख किंवा ज्येष्ठतम अधिकारी यांच्या उपस्थितीत सर्व अधिकारी / कर्मचारी प्रतिज्ञा करतील. (प्रतिज्ञेचा नमुना सोबत जोडला आहे.)

क) प्रतिज्ञा केल्यानंतर मा. राज्यपाल व मा. मुख्यमंत्री यांनी या सप्ताहानिमित्त दिलेला संदेश उपस्थितांना वाचून दाखविण्यात येईल. ( संदेशांच्या प्रती सोबत जोडल्या आहेत.)

ड) या सप्ताहाच्या निमित्ताने मा. राज्यपाल व मा. मुख्यमंत्री यांचे संदेश राज्यातील जनतेसाठी प्रसृत करण्यात यावेत.

३. या सप्ताहाच्या निमित्ताने पुढीलप्रमाणे कार्यक्रमांचे आयोजन करण्यात यावे -

अ) कार्यालयांच्या दर्शनी भागात व सार्वजनिक ठिकाणी (जसे, रेल्वेस्थानक, बसथांबे, विमानतळे, इत्यादि) भ्रष्टाचार निर्मूलन जनजागृतीविषयक भित्तिपत्रके/ कापडी फलक/साईन बोर्ड लावण्यात यावेत. व्हॉट्सॲप, इत्यादि इलेक्ट्रॉनिक समाजमाध्यमांचा, ई-मेल्स, एस.एम.एस. यांचाही जनजागृतीसाठी वापर करावा.

ब) मुंबई, पुणे यासारख्या मोठया शहरांतील मोक्याच्या ठिकाणी व्हेरीएबल मेसेज सिस्टिम बोर्डद्वारे भ्रष्टाचार निर्मुलन जनजागृतीविषयक संदेश प्रसारीत करण्यात यावेत.

क) भ्रष्टाचाराच्या दुष्परिणामांवर प्रकाश टाकण्यासाठी कार्यालये/शाळा/ महाविद्यालयांच्या स्तरावर वादविवाद स्पर्धा/व्याख्याने/ निबंधस्पर्धा/ कार्यशाळा/ चर्चासत्र/ मुलाखती यांचे आयोजन करावे.

ड) भ्रष्टाचार निर्मूलन जनजागृतीविषयक विशेष पुस्तिकांचे प्रकाशन व वाटप करावे.

इ) राज्यातील अशासकीय संघटना, स्वयंसेवी संस्था, सामान्य नागरीक यांना दक्षता जनजागृती मोहिमेत मोठया प्रमाणावर/उत्स्फुर्तपणे सहभागी होण्याकरीता आवाहन करावे. त्याकरीता पथनाट्ये /नाटिका, काव्यवाचन, इ. नाविन्यपूर्ण व आकर्षक योजना/ कार्यक्रमांची आखणी करावी.

फ) राज्य शासनाचे सर्व विभाग, विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख यांनी त्यांच्या अधिनस्त कार्यालयांत भ्रष्टाचार निर्मूलन जनजागृतीविषयक विविध स्पर्धा/ व्याख्याने/ निबंधस्पर्धा इ. उपक्रमांचे आयोजन करावे.

४. या सप्ताहाच्या आयोजनासाठी स्वतंत्रपणे निधी उपलब्ध करुन दिला जाणार नसल्याने प्रत्येक कार्यालयाने त्यांच्याकडील उपलब्ध निधीतूनच खर्च करावयाचा आहे.

५. दक्षता जनजागृती सप्ताहाच्या आयोजनासंबंधीची जबाबदारी महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांच्यावर सोपविण्यात आली आहे. त्यांनी सदर सप्ताहाचे आयोजन करुन त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा.

६. सर्व मंत्रालयीन विभागांना विनंती करण्यात येते की, त्यांनी या सूचना त्यांच्या आधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख यांच्या निदर्शनास आणाव्यात.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०२५१०१४११०८३०८९०७ असा आहे. हे परिपत्रक डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SUCHITA MOHAN MAHADIK

Digitally signed by SUCHITA MOHAN MAHADIK
DN: CN = SUCHITA MOHAN MAHADIK, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT
Date: 2025.10.14 11:11:44 +05'30'

**(सुचिता महाडिक)**
**सह सचिव, सामान्य प्रशासन विभाग**

**सोबत- सहपत्रे**

प्रति,

१. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव,
२. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,
३. उपमुख्यमंत्री (न.वि.वि.) यांचे सचिव,
४. उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे सचिव,
५. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव,
६. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव,
७. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव,
८. उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव,

९. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा,
१०. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद,
११. सर्व विधीमंडळ सदस्य
१२. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
१३. शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव/ सचिव,
१४. सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
१५. महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१६. *प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई,
१७. *प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई,
१८. *प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
१९. *सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
२०. *सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
२१. *आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, मुंबई
२२. *महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई
२३. सर्व विभागीय आयुक्त, सर्व जिल्हाधिकारी, सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,
२४. सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालयीन विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख,
२५. सामान्य प्रशासन विभागाची आस्थापना शाखा, मंत्रालय, मुंबई ३२.
२६. निवडनस्ती - कार्यासन विचौ-२ (११अ)

*पत्राने

## <u>प्रतिज्ञा</u>

आपल्या देशाच्या आर्थिक, राजकीय आणि सामाजिक प्रगतीमध्ये भ्रष्टाचार हा प्रमुख अडथळा आहे  असे मला वाटते. भ्रष्टाचार निर्मुलनासाठी सरकार, नागरिक आणि खाजगी क्षेत्र या सर्व घटकांनी संघटितपणे काम करण्याची आवश्यकता आहे असे मला वाटते.

प्रत्येक नागरिकाने दक्ष राहायला पाहिजे आणि सदैव प्रामाणिकपणा व सचोटी यांच्या उच्चतम मानकांप्रती वचनबध्द असायला हवे आणि भ्रष्टाचाराविरुध्द लढा देण्यासाठी  साथ दिली पाहिजे याची मला जाणीव आहे.

म्हणून  मी प्रतिज्ञा घेतो की :

- जीवनाच्या सर्व क्षेत्रांत सच्चेपणा आणि कायद्याचे पालन करेन.
- लाच घेणार नाही  आणि लाच देणार नाही.
- सर्व कामे प्रामाणिकपणाने आणि पारदर्शक पद्धतीने करेन.
- जनहितासाठी कार्य करेन.
- व्यक्तिगत वागणूकीत सचोटी दाखवून उदाहरण घालून देईन.
- भ्रष्टाचाराच्या कोणत्याही घटनेची माहिती योग्य अभिकरणास देईन.



File No. DGP-D16034(31)/1/2023-DESK 16 (Computer No. 57378)
Generated from eOffice by PANKAJ GAUTAM PEDNEKAR, HEAD CLERK (PGP) DESK 16 -DGPMS, HD CLERK (DESK 16), DGPMS on 20/10/2025 11:46 am

दक्षता जनजागृती सप्ताह (Vigilance Awareness Week) साजरा करण्याबाबत.
दि.३१ ऑक्टोबर, ते ६ नोव्हेंबर

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण-२००१/११२८/प्र.क्र.४३/०१/११-अ,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २२ ऑक्टोबर, २००१.

**शासन निर्णय :-**

राज्यात गतवर्षी प्रथमच दि. ३१ ऑक्टोबर ते ४ नोव्हेंबर, २००० या कालावधीत "दक्षता जागरुकता सप्ताह" (Vigilance Awareness Week) आयोजित करण्यात आला होता. जनतेमध्ये भ्रष्टाचाराबाबत जागृती निर्माण करण्याच्या दृष्टीने सदर उपक्रम अत्यंत उपयुक्त सिध्द झाल्याने आता, प्रतिवर्षी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या दि.३१ ऑक्टोबर या जन्मदिवसापासून एक आठवडा (दि. ३१ ऑक्टोबर ते ६ नोव्हेंबर) या कालावधीत "दक्षता जनजागृती सप्ताहाचे"(Vigilance Awareness Week) आयोजन करण्यात यावे असा निर्णय घेण्यात आला आहे.

दक्षता जनजागृती सप्ताहाचे आयोजन करताना पुढे नमूद केलेल्या मार्गांचा अवलंब करण्यात यावा.

अ) राज्य शासनाचे सर्व विभाग व त्यांच्या नियंत्रणाखालील सर्व विभागप्रमुख/ कार्यालय प्रमुख, राज्य शासनाचे अंगीकृत उपक्रम, सहकारी संस्था, स्वायत्त संस्थामार्फत सप्ताहाचे आयोजन करण्यात यावे.

ब) दि. ३१ ऑक्टोबर रोजी सकाळी ११.०० वाजता भ्रष्टाचार निर्मूलनाची शपथ घेऊन कार्यक्रमाचा प्रारंभ होईल. विभाग/ कार्यालय प्रमुख किंवा उपस्थितांपैकी ज्येष्ठतम अधिकारी सर्वांना शपथ देतील. (शपथेचा नमुना सोबत जोडला आहे.)

क) शपथ घेतल्यानंतर मा.राज्यपाल व मा.मुख्यमंत्री यांनी या सप्ताहानिमित्त दिलेला संदेश उपस्थितांना वाचून दाखविण्यात येईल.

ड) या सप्ताहाच्या निमित्ताने मा.राज्यपाल व मा.मुख्यमंत्री यांचा संदेश राज्यातील जनतेसाठी प्रसृत करण्यात यावा.

इ) या सप्ताहाच्या निमित्ताने पुढील कार्यक्रमांचे आयोजन करण्यात यावे.

१. कार्यालयाच्या दर्शनी भागात व मोक्याच्या ठिकाणी भित्तीपत्रक, कापडी फलक लावणे.
२. कार्यालये/शाळा/महाविद्यालयांमध्ये भ्रष्टाचाराच्या दुष्परिणामांवर प्रकाश टाकण्यासाठी चर्चासत्रे/ वादविवाद स्पर्धा/व्याख्याने/निबंधस्पर्धा/कार्यशाळा यांचे आयोजन करणे.
३. विशेष पुस्तिकांचे (Special Journal) प्रकाशन करणे.
४. राज्यातील अशासकीय संघटना, स्वयंसेवी संस्था, सामान्य नागरीक यांना दक्षता जनजागृती मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहन करणे.

कृ.मा.प.

५. केंद्रीय दक्षता आयोगाच्या http://www.cvc.nic.in या संकेतस्थळावर (Web-site) उपलब्ध साहित्याचा जनतेमध्ये वितरणासाठी उपयोग करणे.

याव्यतिरिक्त कार्यालयीन इमारतीच्या दर्शनी भागावर "भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंध विभागाशी संपर्क साधावा" अशी सूचना व लाचलुचपत प्रतिबंध विभागाच्या स्थानिक कार्यालयाचा पत्ता आणि दूरध्वनी क्रमांक लिहिलेला कायमस्वरुपी फलक लावण्यात यावा.

या सप्ताहाच्या आयोजनासाठी स्वतंत्रपणे निधी उपलब्ध करुन देता येणार नसल्याने प्रत्येक कार्यालयाने त्यांच्याकडील उपलब्ध निधीतूनच खर्च करावा.

दक्षता जनजागृती सप्ताहाच्या आयोजनासंबंधीची जबाबदारी महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंध विभाग यांच्यावर सोपविण्यात येत आहे. त्यांनी याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(बी.के.अग्रवाल)
शासनाचे अपर मुख्य सचिव.

प्रति,

राज्यपालांचे प्रधान सचिव,
मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहाय्यक,
शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
* प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई,
* प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र विधान सभा सचिवालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र विधान परिषद सचिवालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
* आयुक्त राज्य निवडणूक आयोग, मुंबई
सर्व मंत्रालयीन विभाग,
मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग/कार्यालय प्रमुख,
सा.प्र.विभागातील सर्व प्रशासकीय कार्यासने,
निवड नस्ती.

**आचार्य देवव्रत**

**Acharya Devvrat**



राज भवन
मलबार हिल मुंबई ४०००३५
**Raj Bhavan,**
**Malabar Hill, Mumbai 400035**

सत्यमेव जयते

**राज्यपाल, महाराष्ट्र**
**GOVERNOR OF MAHARASHTRA**

७ अक्टूबर २०२५

# शुभकामना

मुझे यह जानकर प्रसन्नता है कि महाराष्ट्र सरकार २७ अक्टूबर से २ नवम्बर २०२५ तक "सतर्कता : हमारी साझा जिम्मेदारी" विषय पर सतर्कता जागरूकता सप्ताह मना रही है।

यह सर्वमान्य है कि भ्रष्टाचार देश की आर्थिक, राजनीतिक और सामाजिक प्रगति के मार्ग में एक प्रमुख बाधा है। इस बुराई का उन्मूलन करने के लिए सरकार, नागरिक, निजी क्षेत्र तथा नागरिक समाज - सभी को मिलकर साझा जिम्मेदारी की भावना से कार्य करना होगा। पारदर्शिता, ईमानदारी और जवाबदेही को जीवन के सभी क्षेत्रों में बढ़ावा देकर हम अपने लोकतंत्र की नींव को और सुदृढ़ कर सकते हैं तथा सतत विकास सुनिश्चित कर सकते हैं। सामूहिक प्रयास नागरिकों को नैतिक मूल्यों के पालन हेतु प्रेरित करेंगे और हमें 'विकसित भारत २०४७' के लक्ष्य की ओर निरंतर आगे बढ़ाएंगे।

इस अवसर पर मैं सभी से अपील करता हूँ कि वे महाराष्ट्र को भ्रष्टाचार-मुक्त राज्य बनाने का संकल्प लें और एक न्यायपूर्ण, पारदर्शी एवं प्रगतिशील समाज के निर्माण में सक्रिय योगदान दें।

(आचार्य देवव्रत)

देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री
महाराष्ट्र

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२



जा.क्र/मु.मं.स/ज.क./७७६/२०२५
दि. २६ सप्टेंबर, २०२५

# शुभेच्छा

राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागामार्फत दि. २७ ऑक्टोबर, ते २ नोव्हेंबर, २०२५ या कालावधीत दक्षता जनजागृती सप्ताह साजरा करण्यात येणार असल्याचे समजून आनंद झाला.

जनतेमध्ये भ्रष्टाचाराच्या विरोधात जनजागृती करण्याच्या दृष्टीने केंद्रीय दक्षता आयोगाच्या धर्तीवर राज्यात हा सप्ताह साजरा केला जात आहे. हा सप्ताह औपचारिक कार्यक्रम नसून समाजात प्रामाणिकपणा, पारदर्शकता आणि जबाबदारीची जाणीव जागृत करण्याचा प्रभावी उपक्रम आहे.

भ्रष्टाचारामुळे विकासाची गती रोखली जाते, सामान्य जनतेचा विश्वास ढळतो आणि सामाजिक असमानता वाढीस लागते. त्यामुळे भ्रष्टाचाराला आळा घालणे काळाची गरज आहे.

आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेल्या 'भ्रष्टाचारमुक्त भारत' संकल्पनेला वास्तवात आणण्यासाठी ही जनजागृती मोहीम अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. नागरिकांचा सक्रीय सहभाग, प्रामाणिक आचरण आणि पारदर्शक प्रशासन यांच्या संगमातूनच भ्रष्टाचारमुक्त भारत साकार होऊ शकतो.

दक्षता जनजागृती सप्ताहाच्या माध्यमातून आपण सर्वांनी भ्रष्टाचारविरोधी भूमिका घेत, प्रामाणिकता आणि पारदर्शक कारभारातून विकसित भारताच्या निर्मितीत आपले योगदान द्यावे, असे आवाहन यानिमित्ताने करतो.

या मोहीमेच्या यशस्वीतेसाठी मन:पूर्वक शुभेच्छा!

(देवेंद्र फडणवीस)

दूरध्वनी : ०२२-२२०२ ५१५१/२२०२ ५२२२ ई-मेल : cm@maharashtra.gov.in
वेब साईट : www.maharashtra.gov.in



File No. DGP-D16034(31)/1/2023-DESK 16 (Computer No. 57378)
Generated from eOffice by PANKAJ GAUTAM PEDNEKAR, HEAD CLERK (PGP) DESK 16 -DGPMS, HD CLERK (DESK 16), DGPMS on 20